# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ६९२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २१/१०/२०१६

**१) जनावराची निदर्यतेने,कृरपने कोंबुन जनावरांची वाहतुक करीत असतांना लाकडी फडी तुटुन जनावरे खाली पडुन मानवी जिवीतास धोका निर्माण अश्या स्थितीत मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक २०/१०/२०१६ रोजी १९.३० वा. दर. यातील आरोपी वाहन चालक क्र. १ याने आरोपी क्र. ०२ यांचे मदतीने आपल्या ताब्यातील महीन्द्रा पिकअप या वाहनात २ गायी, ३ गोरे असे एकुण ५ जनावरे कि. १,१०,००/–रु. चे निदर्यतेने, कृरपने कोंबुन वाहनाची मागील लाकडी फडी तुटुन जनावरे खाली पडुन मानवी जिवीतास धोका होईल अशा स्थितीत जनावराची वाहतुक करतांनी बिरसा मुंडा चौक सेंदुरवाफा येथे मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. निबार्ते पो.स्टे साकोली यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३४ भांदवि. सहकलम ११(१)(ड) प्रा. नि. वा. कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. खडसे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**२) गळफास लावुन इसमाचा मृत्यु . :–**

दिंनाक. १९/१०/२०१६ रोजी २३.३० वा. दर. यातील मृतक श्रीकांत गौरीशंकर रामटेके वय ४० वर्ष, रा. हरदोली याने स्वत:चे घरी दारुचे नशेत घराचे लाकडी गयीला (मयाल)प्लॉस्टीक केनचे दोरीने गळफास लावुन मरण पावल्याने फिर्यादी विदेश नत्थु रामटेके वय २३ वर्ष, रा. हरदोली यांचे तोंडी रिपोर्ट वरून पो.स्टे आंधळगाव येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सोलंकी पो. स्टे. आंधळगाव हे करीत आहेत.

**३) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–**

दिनांक २०/१०/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ६५ प्रकरणांची नोंद कण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०२ तसेच तिन सिटर वाहनांवरती ०७ केसेस व ईतर वाहनांवरती ५६ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.